महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) (पूर्व) व (मुख्य) स्पर्धा परीक्षा
Maharashtra Subordinate Services, Gr. B (Non-Gazetted) (Pre) & (Main) Competitive Exam

परीक्षेचे टप्पे : - १. संयुक्त पूर्व परीक्षा – १०० गुण
२. मुख्य परीक्षा - ४०० गुण (पेपर क्र.-१ संयुक्त व पेपर क्र.२ स्वतंत्र)

महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) संयुक्त (पूर्व) परीक्षा.
Maharashtra Subordinate Service, Gr.-B. (Non-Gazetted) Combined (Pre) Exam

-:परीक्षा योजना :-

प्रश्नपत्रिकेची संख्या - एक.

विषय व संकेतांक	प्रश्नसंख्या	एकुण गुण	दर्जा	माध्यम	परीक्षेचा कालावधी	प्रश्नपत्रिकेचे स्वरुप
सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक क्र. ०१२)	१००	१००	पदवी	मराठी व इंग्रजी	एक तास	वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

-: अभ्यासक्रम :-

अनु. क्र.	विषय
सामान्य क्षमता चाचणी	
१)	**चालु घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील.
२)	**नागरिकशास्त्र** - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन) ग्राम व्यवस्थापन (प्रशासन).
३)	**इतिहास** -आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास.
४)	**भूगोल** (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे, इत्यादी.
५)	**अर्थव्यवस्था –** **भारतीय अर्थव्यवस्था** - राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी. **शासकीय अर्थव्यवस्था** - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी.
६)	**सामान्य विज्ञान** - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene).
७)	**बुध्दिमापन चाचणी व अंकगणित** **बुध्दिमापन चाचणी** – उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न **अंकगणित** – बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी.

टीप – सदर मुख्य परीक्षेची सुधारित परीक्षा योजना वर्ष २०२० च्या होणाऱ्या परीक्षा पासून लागू राहील.

दिनांक - ०४/०३/२०२०

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सहायक कक्ष अधिकारी, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा
Assistant Section Officer, Gr.-B (Non-gazetted) Main Exam

-: परीक्षा योजना :-

प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन **एकूण गुण — ४००** **पेपर क्र.-१ (संयुक्त पेपर) -२०० गुण**
पेपर क्र.-२ (स्वतंत्र पेपर) -२०० गुण

पेपर क्र. व संकेतांक	विषय	गुण	प्रश्नसंख्या	दर्जा	माध्यम	कालावधी
१ (संकेतांक ०१४)	मराठी	१००	५०	मराठी - बारावी	मराठी	एक तास
	इंग्रजी	६०	३०	इंग्रजी - पदवी	इंग्रजी	
	सामान्य ज्ञान	४०	२०	पदवी	मराठी -इंग्रजी	
२ (संकेतांक ५०३)	सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान	२००	१००	पदवी	मराठी व इंग्रजी	एक तास

अभ्यासक्रम

पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.

अनु.क्र.	विषय
१.	**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे
२.	**इंग्रजी :** - Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.
३.	**सामान्य ज्ञान**
	१. चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील.
	२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५
	३. संगणक व माहिती तंत्रज्ञान - आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य.

पेपर क्रमांक -२.....

पेपर क्रमांक -२ - सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.

अनु.क्र.	विषय
१.	**बुध्दिमत्ता चाचणी**
२.	**महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.
३.	**महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परीणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न.
४.	**भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे - शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ - Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या.
५.	**राजकीय यंत्रणा** (शासनाची रचना अधिकार व कार्ये) **केंद्र सरकार, केंद्रिय विधिमंडळ आणि राज्य सरकार व प्रशासन** (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ).
६.	**जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन**
७.	**न्यायमंडळ** - न्यायमंडळाची रचना, एकात्मीक न्यायमंडळ - कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये - लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका.
८.	**नियोजन** - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रुपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल.

दिनांक - ०४/०३/२०२०

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग